**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXXII) 532 -B
ISSN : 2278-9308
October 2025

# खान्देशातील जिल्ह्यांमधील सामाजिक आणि आर्थिक विषमतेचा अभ्यास

संशोधन मार्गदर्शक
प्राचार्य.डॉ. दिलीप रामभाऊ जगताप
कै. अण्णासाहेब पितांबर शंकर वाडिले
कला महाविद्यालय थाळनेर
कवठे महांकाळ जि.सांगली

संशोधक
प्रा. रामदास रमेश वसावे
(सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग)
पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय ता. शिरपूर जि. धुळे
मो. ९४२०६५६३५९

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. या विविधतेमुळेच देशाच्या विकास प्रक्रियेत अनेक प्रकारचे असमतोल निर्माण झाले आहेत. सामाजिक आणि आर्थिक विकास हे कोणत्याही प्रदेशाच्या प्रगतीचे महत्त्वाचे निर्देशक मानले जातात. मात्र, सर्व क्षेत्रांमध्ये विकासाचा वेग समान राहिलेला नाही. काही भाग झपाट्याने विकसित झाले आहेत, तर काही भाग आजही मागासलेपणातून बाहेर आलेले नाहीत.

महाराष्ट्र राज्यातील खान्देश विभाग – जळगाव, धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे याचे उत्तम उदाहरण आहे. या भागात शिक्षण, उद्योग, आरोग्यसेवा, शेती आणि पायाभूत सुविधा यांमध्ये लक्षणीय फरक दिसून येतो. जळगाव जिल्हा तुलनेने अधिक प्रगत असून धुळे आणि नंदुरबार जिल्हे मागास आहेत. या असमतोलामुळे दरडोई उत्पन्न, साक्षरता दर, औद्योगिकीकरण, रोजगार आणि आरोग्य सुविधांमध्ये तफावत निर्माण झाली आहे. सामाजिक व आर्थिक असमतोलामुळे समाजात गरिबी, बेरोजगारी, स्थलांतर, आरोग्य समस्या आणि सामाजिक विषमता वाढीस लागतात. म्हणूनच, या असमतोलाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. या अभ्यासाचा उद्देश म्हणजे विविध जिल्ह्यांमधील विकासातील तफावत ओळखणे, त्या मागील कारणांचे विश्लेषण करणे आणि संतुलित प्रादेशिक विकासासाठी उपाययोजना सुचविणे हा आहे. महाराष्ट्रातील खान्देश हा प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्राचा भाग मानला जातो. या भागात धुळे, नंदुरबार व जळगाव ही प्रमुख जिल्हे येतात. भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या हा प्रदेश वैशिष्ट्यपूर्ण असला तरी विकासाच्या दृष्टीने जिल्हानिहाय विषमता प्रकर्षाने दिसून येते. माझ्या या अभ्यास विषयाचा उद्देश म्हणजे जिल्हानिहाय आर्थिक व सामाजिक निर्देशकांचा अभ्यास करून त्यातील तफावत अधोरेखित करणे हा आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे**

१. खान्देशातील प्रमुख जिल्ह्यांचा आर्थिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२. सामाजिक विकासाच्या निर्देशकांचा (शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा) आढावा घेणे.
३. विकासातील विषमतेची कारणे शोधणे.
४. विषमता कमी करण्यासाठी शिफारसी करणे.

**संशोधनाचे गृहीतके :-**

१. खान्देश विभागातील सामाजिक व आर्थिक विषमता अधिक प्रमाणात आहेत.
२. आदिवासी बहुल भागात सामाजिक व आर्थिक असमतोलामुळे समाजात गरिबी, बेरोजगारी, स्थलांतर, आरोग्य समस्या अधिक आहेत.
३. शहरी व ग्रामीण भागातील विकासातील तफावतीमुळे प्रादेशिक विषमता वाढत आहे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधात तुलनात्मक व विश्लेषणात्मक पद्धत संशोधन पद्धतीचा वापर केला असून तथ्य संकलनासाठी काही प्राथमिक सामग्री व दुय्यम सामग्रीत यात जनगणना अहवाल (2011, 2021 चा अंदाज), महाराष्ट्र शासनाचे



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXXII) 532 -B
ISSN : 2278-9308 October 2025

आर्थिक सर्वेक्षण, जिल्हानिहाय विकास अहवाल, शैक्षणिक संदर्भग्रंथ, शोधनिबंध, वर्तमानपत्र, इंटरनेट, सरकारचे संकेतस्थळ, नियतकालिके .मासिके .व विविध लेखांचा इत्यादीचा वापर केला आहे .

**आर्थिक - सामाजिक विषमतेचे मुख्य निर्देशक घटक:**

खान्देश (धुळे, नंदुरबार, जळगाव) या तीन जिल्ह्यांमधील आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या विषमतेचा अभ्यास करण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांक (Human Development Index), दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, उद्योगधंद्यांची स्थिती, शेतीविषयक विकासाचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे. या जिल्ह्यांचा तुलनात्मक अभ्यास करताना, विकासातील अडथळे, संसाधनांचे असमान वाटप, तसेच विविध सामाजिक गटांमधील तफावत यावर लक्ष केंद्रित केले जाते.

**१. मानव विकास निर्देशांक (HDI):**

प्रत्येक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक तपासावा. यावरून कोणत्या जिल्ह्याचा विकास अधिक चांगला आहे, हे समजते.

**खान्देश भागातील जिल्ह्यांची सापेक्ष मानवी विकास स्थिती: सन २०११**

| जिल्हा | मानव विकास निर्देशांक २०११ | मानव विकास सापेक्ष श्रेणी |
|---|---|---|
| नंदुरबार | ०.६०४ | |
| धुळे | ०.६७१ | निम्न मानव विकास स्तर |
| जळगाव | ०.७२३ | मध्यम मानव विकास स्तर |
| महाराष्ट्र | ०.७५२ | |

*Maharashtra Human Development Report 2012*

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की सन २०११ च्या जणगणनेचा विचार करता खान्देश मधील आदिवासी बहुल लोकसंख्या असेलल्या जिल्ह्यातच सर्वात कमी म्हणजे निम्न मानव विकास निर्देशांक आहेत. त्यात नंदुरबार, धुळे इत्यादी त्यातही नंदुरबारचा ०.६०४ एवढा सर्वात कमी आहेत. मध्यम मानव विकास निर्देशांक स्तराचा विचार करता जळगाव हे काही आदिवासी लोकसंख्या जिल्ह्यांचा समावेश आहे . एकंदरीत विचार करता नंदुरबार व धुळे जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी व निम्न मानव विकास निर्देशांक आहेत. त्याचबरोबर उच्च मानव विकास स्थर व अतिउच्च मानव विकास स्थर असलेल्या जिल्ह्यामध्ये एकाही जिल्ह्याचा समावेश होतांना दिसत नाही यावरून असे लक्षात येते की भागात प्रादेशिक , आर्थिक , सामाजिक विकासातील विषमता फार मोठ्या प्रमाणात दिसुन येते.

२. साक्षरता दर :- २०११ च्या जनगणनेनुसार राज्यात सर्वात कमी साक्षरतेचा जिल्हा म्हणून नंदुरबार प्रचलित आहे. खान्देश विभागात सुद्धा साक्षरतेमध्ये अधिक प्रमाणात विषमता दिसुन येते.

| जिल्हा | साक्षरता दर २०११ | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|
| जळगाव | ७९.७३ % | ८८.३८% | ७५.८७% |
| धुळे | ७२.८० % | ७९.५ % | ६५.७७ % |
| नंदुरबार | ६४.३८ % | ७२.१७ % | ५६.४७ % |
| महाराष्ट्र | ८२.३४% | ८८.३८% | ७५.९% |

वरील तक्त्यावरून असे दिसुन येते की खान्देश भागात जळगाव जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ७९.७३ % असून पुरुष ८८.३८% स्त्री ७५.८७% साक्षरता प्रमाण आहे. धुळे जिल्ह्यात ७२.८० % साक्षरता पुरुष ७९.५ % स्त्री ६५.७७ % साक्षरता प्रमाण आहे.असून नंदुरबार जिल्ह्यात ६४.३८ साक्षरता असून पुरुष साक्षरता ७२.१७ % आणि साक्षरतेचे प्रमाण ५६.४७ % इतक्या कमी प्रमाणात आहे. त्याचबरोबर स्त्री -पुरुष साक्षरता प्रमाणात सुद्धा अधिक विषमता दिसुन येत आहे.



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXXII) 532 -B
ISSN : 2278-9308
October 2025

३. **प्रति व्यक्ति उत्पन्नातील विषमता :-** जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये दरडोई उत्पन्नातील विषमता ही एक गंभीर समस्या आहे. या प्रदेशात शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील विषमतेमुळे ही समस्या निर्माण झाली आहे. जळगाव जिल्ह्यात कापूस, केळी आणि चहा यांसारख्या पिकांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जाते, परंतु या क्षेत्रातील शेतकरी आणि कामगार यांचे उत्पन्न इतर क्षेत्रांच्या तुलनेत कमी आहे [1].

धुळे जिल्ह्यातील अर्थव्यवस्था देखील शेती आणि उद्योगांवर अवलंबून आहे. येथे सिंचन सुविधांचा अभाव आणि जमीन वाटपाच्या विषमतेमुळे शेतकरी वर्गातील लोकांचे उत्पन्न कमी आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील अर्थव्यवस्था देखील शेती आणि आदिवासी समुदायांवर अवलंबून आहे. येथे शिक्षण आणि आरोग्य सुविधांचा अभाव आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे या प्रदेशातील लोकांचे उत्पन्न कमी आहे.

या विषमतेचे कारणे समजून घेण्यासाठी आणि त्यावर उपाय करण्यासाठी सरकार आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

**४. औद्योगिक विकासाचा तुलनात्मक आढावा :-**

खान्देश विभागातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी निगडित आहेत. या तीनही जिल्ह्यांमध्ये शेती हे प्रमुख व्यवसाय असून औद्योगिकीकरणाचा वेग अत्यंत कमी दिसून येतो. जळगावमध्ये काही प्रमाणात उद्योग-धंद्यांचा विकास झालेला असला, तरी धुळे आणि विशेषतः नंदुरबारमध्ये औद्योगिक विकास अत्यंत मर्यादित आहे. या असमतोलामुळे या प्रदेशात औद्योगिक विषमता निर्माण झाली आहे.

| घटक | जळगाव | धुळे | नंदुरबार |
|---|---|---|---|
| औद्योगिक वसाहती (MIDC) | ६ (जसे-अमळनेर, फैजपूर, जळगाव इ.) | ३ (धुळे, शिरपूर, साक्री) | २ (नंदुरबार, शहादा) |
| मुख्य उद्योग प्रकार | कापूस प्रक्रिया, केळी प्रक्रिया, पॉलिटेक्सटाईल्स | वस्त्र, केमिकल, खाद्यप्रक्रिया | कृषी-आधारित लघुउद्योग |
| रोजगार संधी | मध्यम | कमी | अतिशय कमी |
| गुंतवणूक स्तर | उच्च (स्थानीय व बाह्य गुंतवणूक) | मध्यम | कमी |
| उद्योग विकास दर | ७.५ % | ४.२ % | २.८ % |

वरील तक्त्यानुसार जळगाव जिल्हा औद्योगिक दृष्ट्या सर्वाधिक प्रगत आहे. येथे औद्योगिक वसाहतींची संख्या जास्त असून, रोजगार आणि गुंतवणूक या दोन्ही बाबतीत जळगाव आघाडीवर आहे. धुळे जिल्ह्यात काही औद्योगिक क्रियाकलाप सुरू असले तरी त्यांचा व्याप मर्यादित आहे. नंदुरबार जिल्हा मात्र सर्वात मागे असून औद्योगिकीकरणाचा दर अत्यल्प आहे. त्यामुळे या तीन जिल्ह्यांमध्ये औद्योगिक विषमता स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात रोजगाराची उपलब्धता नसल्यामुळे महाराष्ट्रातील आणि गुजरात राज्यातील विविध शहरी भागात स्थलांतराचे प्रमाण दिवसेंदिवस अधिक वाढत आहे.

**४. शेती व सिंचन क्षेत्र :-**

| घटक | जळगाव | धुळे | नंदुरबार |
|---|---|---|---|
| सिंचन सुविधा | ४८% | ३२ % | १८ % |
| मुख्य पिके | केळी, कापूस, ऊस, सोयाबीन | ज्वारी, कापूस, सोयाबीन | तांदूळ, मका, ज्वारी |
| पावसावर अवलंबित्व | मध्यम (तापी नदी व कालवे) | जास्त (मर्यादित सिंचन सुविधा) | अत्यंत जास्त (मुख्यतः पावसावर आधारित शेती) |
| सिंचन प्रकल्प | हाटी प्रकल्प, गिरणा धरण, तापी कालवा | पांझरा धरण, बुराई प्रकल्प | तोरणमाळ, साखळी लघु प्रकल्प |
| शेती उत्पादकता प्रमाण | जास्त | मध्यम | कमी |



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXXII) 532 -B
ISSN : 2278-9308
October 2025

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की जळगाव जिल्हा सिंचन व शेती क्षेत्रात तुलनेने अधिक विकसित आहे कारण येथे तापी नदी आणि कालव्यांमुळे पुरेसे पाणी उपलब्ध होते.साधारण ४८% सिंचनाच्या सोई असल्यामुळे शेतीत व्यापारी पिके (केळी, कापूस, ऊस, सोयाबीन) अधिक प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

धुळे जिल्ह्यात ३२ % सिंचन प्रकल्प असले तरी बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे ज्वारी, कापूस व सोयाबीन पिकाचे उत्पादन अधिक घेतले जाते.

नंदुरबार जिल्हा मात्र भौगोलिक व पर्जन्यमानाच्या मर्यादा आणि अपुरे जलस्रोत यांमुळे शेती व सिंचन विकासात सर्वाधिक मागे म्हणजे फक्त १८ % सिंचन सुविधा आहे. त्याच बरोबर जिल्ह्यातील बराचसा प्रदेश हा डोंगराळ व अतिदुर्गम असल्यामुळे जिल्ह्यातील शेती विकासात देखील भिन्नता दिसुन येते.

शेती व सिंचन क्षेत्र विषमतेची काही कारणे आहेत त्यात भौगोलिक व हवामानातील फरक ,सिंचन प्रकल्पांची अपुरी संख्या ,पर्जन्यमानातील अनिश्चितता , जलसंवर्धनाबाबत अपुरी जागरूकता , शासकीय योजनांची असमान अंमलबजावणी इत्यादीमुळे शेती व सिंचन क्षेत्रातील विषमता आढळून येते. त्यामुळे त्याचे परिणाम तिन्ही जिल्ह्यात शेतीतील उत्पादनात प्रचंड फरक, शेतकऱ्यांचे आर्थिक असमानता, स्थलांतर आणि बेरोजगारी ,सिंचनावर आधारित आणि पावसावर आधारित शेतीत तफावत इत्यादीमुळे शेती उत्पादकतेतदेखील विषमता दिसुन येते.

५. आरोग्यसेवा मधील विषमता (Health Services Inequality)" :-

जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांच्या सामाजिक विकासावर थेट परिणाम करणारा महत्त्वाचा मुद्दा आहे. खाली तुलनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपात सविस्तर माहिती दिली आहे

| घटक | जळगाव | धुळे | नंदुरबार |
|---|---|---|---|
| सरकारी रुग्णालये (जिल्हा + तालुका स्तर) | १+१५+=१६ | १+७=८ | १+६=७ |
| खाजगी रुग्णालये / क्लिनिक | मोठ्या प्रमाणात (शहरकेंद्रित) | मध्यम प्रमाणात | अत्यल्प |
| डॉक्टर-लोकसंख्या गुणोत्तर | १:१३०० | १:२४०० | १:४२०० |
| प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) | ८५ | ७२ | ६२ |
| बालक व मातामृत्यू दर (प्रति १००० मागे) | २४ | ३२ | ४६ |
| वैद्यकीय महाविद्यालये व प्रशिक्षण संस्था | २ | १ | (१प्रस्तावित २०२४) |
| आरोग्य सुविधा उपलब्धता (सर्वसाधारण स्तर) | जास्त | मध्यम | कमी |

या तक्त्यातून स्पष्ट होते की जळगाव जिल्हा आरोग्य सेवांमध्ये तुलनेने प्रगत आहे. येथे वैद्यकीय महाविद्यालये, खाजगी रुग्णालये आणि डॉक्टरांची संख्या जास्त आहे. तसेच सरकारी रुग्णालयाची संख्या देखील जळगावमध्ये जास्त असून धुळे, नंदुरबार मध्ये कमी आहेत.

धुळे जिल्ह्यात आरोग्य सुविधा मध्यम स्तरावर असून शहरांमध्ये चांगल्या सुविधा आहेत पण ग्रामीण भागात अजूनही कमतरता आहे.

नंदुरबार जिल्हा मात्र आरोग्य सेवांच्या बाबतीत सर्वाधिक मागे आहे — विशेषतः आदिवासी व डोंगराळ भागांमध्ये वैद्यकीय सुविधा अत्यंत मर्यादित असल्यामुळे शासकीय आरोग्य सेवा लोकसंख्येचा मानाने कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात कुपोषण आणि आजारांचे प्रमाण जास्त. माता मृत्यूदर आणि शिशुमृत्यू वाढ जास्त आहे याचा शैक्षणिक व सामाजिक विकासावर परिणाम होत आहे.

खान्देश विभागात ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवेतील अंतर वाढ होतांना दिसुन येत आहे. म्हणून ग्रामीण भागातील कामगार उत्पादकतेत घट होत आहे. त्याला काही घटक कारणीभूत आहे त्यामध्ये नंदुरबार जिल्ह्याचा बरचसा प्रदेश डोंगराळ असल्याने आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी अडचणी येतात. तसेच डॉक्टर व



Scanned with OKEN Scanner

आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता तर आहेच पण बऱ्याचदा – ग्रामीण व दुर्गम भागात डॉक्टर रुजू होत नाहीत. आणि आर्थिक मर्यादामुळे गरीब व आदिवासी लोकांना खाजगी आरोग्य सेवांचा खर्च परवडत नाही.

खान्देश विभागातील आरोग्यसेवेची मुख्य जबाबदारी शासकीय (सरकारी) आरोग्य यंत्रणेवर आहे. सरकारी रुग्णालये ही जिल्हा आणि तालुका स्तरावर लोकांना मोफत किंवा स्वस्त उपचार सेवा पुरवतात. परंतु या रुग्णालयांची संख्या, सुविधा आणि मनुष्यबळ या दृष्टीने जिल्ह्यांमध्ये मोठी असमानता दिसून येते. त्याचबरोबर शासकीय योजना अंमलबजावणीत असमानता दिसुन येते – जळगावमध्ये योजनांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होते , नंदुरबारमध्ये मात्र योजनांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होत नाहीत.

जिल्हानिहाय मुख्य निष्कर्ष :-

१. जळगाव जिल्हा - शेती व व्यापारात आघाडीवर, केळी उत्पादनामुळे राष्ट्रीय पातळीवर ओळख, साक्षरता तुलनेने अधिक, पण औद्योगिकीकरण मात्र मर्यादित आहे.

२. धुळे जिल्हा - शैक्षणिक व आरोग्य सुविधा तुलनेने उपलब्ध , कृषी व लघुउद्योग यावर मुख्य भर, आदिवासी व ग्रामीण भागात विकासाची कमतरता.

३. नंदुरबार जिल्हा- प्रामुख्याने आदिवासी बहुल जिल्हा, सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण स्पष्ट, पायाभूत सुविधा व आरोग्यसेवांमध्ये तफावत, कृषी उत्पादन प्रामुख्याने पावसावर अवलंबून.

संशोधनाचे निष्कर्ष :-

१. खान्देशातील विकासाचा नकाशा असमान आहे. जळगाव जिल्हा तुलनेने प्रगत, धुळे मध्यम स्तरावर, तर नंदुरबार जिल्हा सर्वात मागे असल्याचे आढळते.

२. जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये आरोग्यसेवा पुरवठा आणि उपलब्धतेत स्पष्ट विषमता आढळते. जळगाव तुलनेने विकसित असला तरी नंदुरबारसारख्या जिल्ह्यांमध्ये मूलभूत आरोग्य सुविधा अपुऱ्या आहेत.

३. नंदुरबार हे या तीनपैकी सर्वात मागे असलेला जिल्हाआहे, विशेषतः सामाजिक, आरोग्य, शिक्षण व आर्थिक बाबतीत.

४. धुळे आणि जळगावमध्येही अंतर आहे — जळगावमध्ये सार्वजनिक सेवा व औद्योगिक संधी थोडे जास्त आहेत; पण ग्रामीण भागात त्यांच्यातही अंतर आहे.

५. आर्थिक विषमता : जळगाव जिल्ह्याचा कृषी-व्यापारातील व उत्पन्नातील विकास इतर दोन जिल्ह्यांपेक्षा जास्त आहे.

६. सामाजिक विषमता : नंदुरबार जिल्ह्यात शिक्षण, आरोग्य, रोजगार या बाबतीत मागासलेपण आहे.

७. पायाभूत सुविधा : धुळे व जळगाव येथे रस्ते, उद्योग, शिक्षण संस्था तुलनेने चांगल्या तर नंदुरबार तुलनेने कमी आहे.

८. जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये शेती आणि सिंचन सुविधांमध्ये स्पष्ट प्रादेशिक विषमता दिसून येते. या विषमतेचे निराकरण करण्यासाठी समतोल जलविकास आणि शासकीय हस्तक्षेप आवश्यक आहे.

शिफारसी :-

१. नंदुरबारसारख्या जिल्ह्यांत शिक्षण व आरोग्य क्षेत्रावर जास्त गुंतवणूक करणे आवश्यक. त्यासाठी समतोल आरोग्य विकास, वैद्यकीय शिक्षण विस्तार आणि शासकीय हस्तक्षेप यांमुळे या विषमतेत घट आणता येऊ शकते.

२. लघु व मध्यम सिंचन प्रकल्पांची वाढ करणे , पाणी बचत तंत्रज्ञानाचा प्रसार (ड्रिप, स्प्रिंकलर), पावसाचे पाणी साठवण प्रकल्प तयार करणे,

३. सिंचन प्रकल्प व शेतीतील सुधारणा करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण आणि आर्थिक मदत व जलसंवर्धन व पुनर्भरण योजना राबविणे

४. लघुउद्योग व हस्तकला प्रोत्साहन देऊन रोजगारनिर्मिती करणे.



Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (DXXXII) 532 -B
ISSN : 2278-9308
October 2025

५. जिल्हानिहाय गरजेनुसार विकास धोरण आखणे.त्यात

१ . प्राथमिक लक्ष आदिवासी क्षेत्रांना — नंदुरबारमध्ये विशेष विकास योजना, आदिवासी कल्याण पॅकेज, शासकीय सुविधा वाढवणे. शिक्षण सुधारणा — ग्रामपंचायत स्तरावर गुणवत्तापूर्ण शाळा, शिक्षक पुरवठा व डिजिटल शिक्षण पुरविणे.

२. आयुष्यमान (Health & Nutrition) — पोषण कार्यक्रम, महिला व बाल आरोग्य केंद्रे, दूरदराज भागात मोफत व नियमित आरोग्य तपासणी करणे.

३. उद्योग व स्वरोजगार प्रोत्साहन — लघुउद्योग, हस्तकला, कृषी-आधारित उद्योगांना सबसिडी व सुरक्षा देणे.

४. अतिदुर्गम भागात पायाभूत सुविधा विस्तार — रस्ते, सायबर / डिजीटल नेटवर्क, सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे.

५. स्थानीय नियोजन व सहभाग — स्थानिक लोकांचा सहभाग विकास योजनेत असावा, कारण ते त्यांच्या गरजा त्यांना माहित असतात.

संदर्भग्रंथ सूची

१. महाराष्ट्र शासन, *Economic Survey Reports*- (विविध वर्षे).
२. " राष्ट्रीय आरोग्य धोरण आणि आदिवासी लोकांच्या आरोग्याविषयक स्थितीचा अभ्यास " -विशेष संदर्भ नंदुरबार जिल्हा. शोध निबंध - डॉ. दिलीप रामभाऊ जगताप
३. .महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी मुलांची आरोग्य आणि पोषण स्थिती-अभिजित बनसोडे प्रकाशित लेख गुरुवार, मे 23, 2019
४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२० जळगाव, धुळे व नंदुरबार, जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग वार्षिक अहवाल, पुणे.
५. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्हा सांख्यिकी अहवाल.
६. महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण, वित्त विभाग, मुंबई (विविध वर्षे).
७. नॅशनल हेल्थ प्रोफाइल (NHP), भारत सरकार – आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.
८. महाराष्ट्र राज्य आरोग्य मिशन (NHM), जिल्हा आरोग्य योजना अहवाल.
९. www.mahadesh.gov.in
१०. Deshpande, C.D. (2019), *Regional Disparities in Health Infrastructure in Maharashtra*, Pune University Publications.
११. Planning Commission of India (2013), *Report on Health Inequality in Rural India.*
१२. Census of India (2011), Population and Health Data for Maharashtra.
१३. Maharashtra Human Development Report (2012) – UNDP & Government of Maharashtra.